जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८५ दिनांक - २७/०३/२०२४**

चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा करून फरार झालेल्या आरोपीस ठोकल्या बेडया

तक्रारदार यांनी दिले तक्रार वरून चंदननगर पो.स्टे गुन्हा रजिस्टर नं.८९/२०२४, भादविकलम ३०७,४२७,४३५,३०८,१४३,१४७,१४८,१४९, १२० (ब), व क्रिमीनल लॉ अमेंटमेंट ॲक्ट कलम ५,७ अन्वये गुन्हा नोंद करणेत आलेला आहे. दाखल गुन्हयातील आरोपींचा शोधघेण्यासाठी चंदननगर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्या टीम तयार करुन गुन्हयातील १० आरोपींना केवळ २४ तासात अटक केले होते. तसेच यातील पाहिजे आरोपी धीरज दिलीप सपाटे, रा. लेन नंबर १, तुकारामनगर, खराडी पुणे हा गुन्हा दाखल झाले पासुन एका महिन्यापासुन फरार झाला होता. तो पिंपरी चिंचवड, धायरी, कोंढवा, अहमदनगर, बीड असे वेगवेगळे ठिकाणे बदलुन अटक चुकवित होता.

यातील पाहिजे आरोपी धीरज सपाटे याचा शोध घेत असताना, तपास पथकातील पोलीस अंमलदार यांना त्यांचे गोपनीय बातमीदारा मार्फत धीरज सपाटे बाबत बातमी मिळाली, सदर बातमी प्रमाणे तपास पथकाची टीम पोहचली असता त्यास पोलीसांची चाहुल लागताच त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला परंतु त्यास पोलीस स्टाफने पाठलाग करुन ताब्यात घेतले,त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव धीरज दिलीप सपाटे, वय २५, रा. स.न.९, लेन नं.१, तुकारामनगर, खराडी पुणे असे असल्याचे सांगितल्याने त्यास पुढील कार्यवाहीकामी चंदननगर पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्ह्यात अटक केली आहे. पुढील तपास भगवान कांबळे, सहा पोलीस निरीक्षक, हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ श्री. विजय मगर, मा. सहा. पोलीस आयुक्त, येरवडा विभाग श्री. संजय पाटील चंदननगर पोलीस स्टेशनचे. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनीषा पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.पंडित रेजितवाड, यांचे मार्गदर्शनाखाली चंदननगर पो.स्टे.पुणे शहर, तपास पथक पो.उप.निरीक्षक तान्हाजी शेगर, पोलीस अंमलदार अविनाश संकपाळ, श्रीकांत शेंडे, विष्णु गोने, महेश नाणेकर, सचिन रणदिवे शिवाजी धांडे, गणेश हांडगर,शेखर शिंदे, श्रीकांत कोद्रे, सुरज जाधव, नामदेव गडदरे, विकास कदम, ज्ञानोबा लहाणे यांनी केली आहे.